# नेहा

(त्याच्यावरील प्रीत कवितांचा संग्रह - भाग २)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**नेहा** – (त्याच्यावरील प्रीत कवितांचा संग्रह – भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. १३, शके १९४५,
शुक्रवार, दि. २२ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 971-81-970674-2-6

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ १५०/–

# समर्पण

आपल्या प्रियतेमवर

जीवापाड प्रेम करणाऱ्या,

तिला जपणाऱ्या सर्व प्रेमवीरांना

ही कृती सादर समर्पित !

# मनोगत

या जगात सर्वात सुंदर भावना जर कोणती असेल तर ती 'प्रेम' ही प्रेमाने जग जिंकता येणं म्हणतात. एखाद्यासाठी एखादी व्यक्तीच जग होऊन बसत असते. कुणीतरी आपल्या नजरेत भरतं. मग हृदयात शिरतं, मग आयुष्यच होऊन जातं. ते नातं प्रेमाच्या शिंपणानं बहरत जातं. या प्रीतीच्या भावना इतक्या तरल, अलवार व हळव्या असतात की पुरुष मनालाही लोण्याहून मऊशार करून जातात.

या संग्रहात पुरुष मनातील प्रियतमेबद्दलच्या भावना काव्यरूपात अवतरल्या आहेत. बरेच जण मला प्रश्न विचारतात की, तुम्ही एक स्त्री असूनही पुरुष मनाच्या या प्रेमभावना इतक्या सुंदरपणे, हुबेहूब कशा उतरवू शकता? मला एकच सांगावे वाटते, प्रतिमा प्राप्त झालेल्या प्रतिभावानाला स्त्री-पुरुष हा भेद मुळी नसतोच. परकाया प्रवेशाने सर्वांच्या भावना शब्दबद्ध करता येतात, त्या आपसूक भावनांच्या अलंकारांनी सजून धजून काव्यपंक्ती होतात.

या काव्यसंग्रहातून प्रेमाची ही भावना वेगवेगळ्या प्रसंगात आविष्कृत झालेली आहे. रसिकांना वेळोवेळी या प्रीतभावना भावलेल्या आहेत. वाचकमायबाप या काव्यसंग्रहाचं मनस्वी स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**- डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) दोषी सखये मोगरा ... ७
२) एकदाच मज आपुला म्हणशील ... ८
३) स्मृती देखण्या या ... ९
४) तुजवर आजही भुलला ग ... १०
५) परिमळ सुवर्ण चाफी ... ११
६) चेहरा की भाग्य माझे ... १२
७) पावसाळी ही पहाट ... १३
८) अन् हा ऋतू मोहरला ... १४
९) का करीशी प्रीत इतुकी... १५
१०) सहवासाचा सुगंध बकुळी ... १६
११) बट हळवी नखरेल ... १७
१२) कसा विसरू मी तुला प्रिये ग ... १८
१३) हसतेस किती ग गोड ... १९
१४) रूप गोजिरे ... २०
१५) भेटतेस मला अशी ... २२
१६) लाजण्याची तुझी अदा ... २३
१७) जेव्हा हसतेस तू ... २४
१८) गुंतलो शब्दात मी तर ... २५
१९) पैंजणाची रूणझुण ... २६
२०) चिंब भिजले फूल वेडे ... २७
२१) शरदाचं हे चांदणं ... २८
२२) पुण्य बळाने येती कोणी... २९
२३) फुलांचे भरले संमेलन ... ३०
२४) मोगरा जाई जुई वा ... ३२
२५) तू चंद्राची गं कोर ... ३४
२६) छत्रीत सांडलेला ... ३५
२७) अशी पाहू नको ... ३६
२८) फुलं भरल्या करंड्या ... ३८
२९) तू कामिनी मनमोहिनी ... ३९
३०) तुझ्या डोळ्यात जग माझे ... ४०
३१) उंच उंच वनराजी हिरवी ... ४१
३२) गुलाबी छटेची ... ४२
३३) एक फूल वेलीवर ... ४३
३४) डोळे तुझे माझे ... ४४
३५) पायी प्राजक्ताचा सडा ... ४५
३६) पदराआडच्या मुखचंद्राचा ... ४६
३६) अलगदशी लेखणी ... ४८
३८) छेडीशी नवे तराणे ... ४९
३९) जर तू आली असती जीवनी ... ५०
४०) पालवी नव उमलुनी ... ५१
४१) पाऊसवेडी तूही ... ५२
४२) झुळूक बनुनी वाहतो ... ५३
४३) प्रेमचांदण शर्वरी ... ५४
४४) ऋतू मनात शरद हा ... ५५
४५) तू सखा सखीचाही मज... ५६

४६) सांज एवढी
असू दे भारली ... ५७
४७) फकिरीत फकीर राहील... ५८
४८) तिच्या चवीच्या
कथा निराळ्या ... ५९
४९) रोज फिदा तुजवरी ... ६०
५०) सुंदर इतिश्री व्हावी ... ६१
५१) अंतर प्राजक्ताने हरले ... ६२
५२) तूच माझी स्वामिनी ... ६३
५३) मावलो नयनात मी ... ६४
५४) अवचित हात दे हाती ... ६५
५५) मज प्रीत
पुसटशी रहावी ... ६६
५६) जन्म शोधतो मी ग ... ६७
५७) जरी झाकले
नयन बोलके ... ६८
५८) गुलवारगुलाबी ... ६९
५९) तू गुलदानी ... ७०
६०) मन गुलाबाचे ... ७१
६१) कातीलसी नजर ... ७२
६२) सांजवेळी ... ७३
६३) तुझी आस आहे ... ७४
६४) मज भेट अशी ... ७५
६५) सडा आज
गंधाळला सांडणार ... ७६
६६) गहाण असू दे
दिलास माझ्या ... ७७
६७) हायकू - आस ... ७८
६८) हायकू - प्रीत ... ७९
६९) स्वर्ग ठेंगणा
नक्कीच तेथे ... ८०
७०) करशील देवा
मला मोगरा ... ८१
७१) स्वप्नं कांचनी
हो साकार ... ८२
७२) तू अशी ग मनरमणी ... ८३
७३) रूप साधे मोहविते मज... ८४
७४) दोन जीव विसवोत ... ८५
७५) साथी समज ग
मला खरा ... ८६
७६) अजूनही मी ... ८७
७७) तुला पाहण्या
वळती नजरा ... ८८
७८) ती शिल्पा,
ती स्वप्नाली ... ८९
७९) गुलाबकळी
होऊन जीवनी ... ९०
८०) पूर्ण चंद्र तो पुनवेचा ... ९१



## १
## दोषी सखये मोगरा

दोषी सखये मोगरा
मज दोष तू देऊ नको
पाहतो मी त्यास आणिक
न कळे का मी बहकतो

कुठून येती ही फुले
मज नेती तुझिया आठवा
मन क्षणी आभाळ होते
तो क्षणांचा बघ थवा

पाकळी अन पाकळी
गंधात बुडूनी हासते
मी काय करू मज सांग तू
त्या फुलात तू मज भासते

कवळे मल्मली स्पर्श अंग
गंध श्वासातून ये
तीच सुरभी मोगऱ्याची
धुंद मज वेडावते

रोमरोमी अणुरेणू तुन
मोगरा मी होतसे
त्या तुझ्या बघ अंगोपांगी
अन विसावण्या लोभ ते

कल्पनेतील मीलनाच्या
चालल्या कथा मोगरी
आजही तू भासते मज
तीच लोभस नवरी

गंध होते मोगऱ्याचे
की तुझी ती मोहिनी
आजही मी तृप्त त्याने
मोगऱ्याच्या या मनी

दि. ०८/०५/२१
सकाळी ०८.४३ वा.



## २
## एकदाच मज आपुला म्हणशील

रूप असे तव लोभसवाणे
पघळून जातो कणकण
प्रकाश देण्या तुला कवळण्या
हाजीर राणी तनमन

असे तीक्ष्ण तीर नको चालवू
घायाळ मी जायबंदी
एक जखम ना भरते तोवर
पापणी आड मी बंदी

मोजू पापण्या रेखीव सुंदर
की मी डुंबू दे नयनी
एक नजर ती मला छेदते
तुला गर्व तू सुनयनी

जळतो दिव्यासम संपवून मज
तेज तुझेच हे मोही
डोळ्याधल्या दोन ज्योतींच्या
प्रेमात पडतो मीही

त्या ओठांच्या धुंद पाकळ्या
कधी नशिबी येतील
मलाच त्यांच्यासवे प्रदेशी
सुधामृताच्या नेतील

रुळते बट ही चेहऱ्यावरती
हक्क सांगते आपुला
कपाळावरी ऐटीत लटकत
चुंबन घेई कपोला

सुंदर मोहक सरळ नासिका
चेहऱ्याची खुणगाठ
दो भुवयांच्या मधली टिकली
चांदणी शोभे त्यात

जागू न शकतो झोपू न शकतो
जगतो कसे की मरतो
आत तुझ्या तू डोकावून बघ
तुझ्या मनातच उरतो

एकदाच मज आपुला म्हणशील
तुझ्या प्रीत शब्दाने
त्या शब्दातच जगणे माझे
सार्थक शतजन्माने

दि. १८/०५/२१
रात्री १२.३७ वा.




**३**

**स्मृती देखण्या या**

येशील चांदव्या रे
मेघात तू लपुनी
पाहशील हळूच ऐसे
प्रेमाने झाकाळुनी

तुला पाहण्याला
ही जागीच झाडे
फुलांचे हे गुच्छ
हाती ताजेतवाणे

खिडकीत माझी
प्रिया एकली ही
निरखंत तुजला
अशी थांबलेली

शीतल तुझी ही
किरणे दिलासी
तुझ्या चांदण्यातील
या रात्री विलासी

तुला पाहुनी मीही
व्याकुळ होतो
प्रियाभेटीला
खेचखेचून जातो

अशा मीलनाच्या
स्मृती देखण्या या
पुनव चांदण्यावर
पुन्हा रेखण्या ह्या

दि. २२/०५/२१
रात्री ११.४६ वा.



४

## तुजवर आजही भुलला ग

तीन कळ्या ह्या मोगरीच्या
सहज हाती मी धरल्या ग
तुला पाहता अवचित फुलल्या
मनी भावना खुलल्या ग

तू मी शेजारीच होतो ना
अंगणी माझ्या फुलती फुलं
तू रोज रोजची गुंतून यातून
पाहण्या यायची सारी फुलं

काही कळ्या मग मोगरीच्या
नाजूक हाती खुडायचीस
पुन्हा पुन्हा तू याच फुलांच्या
प्रेमामध्ये पडायचीस

आजंही हाती येई मोगरा
तरळून जातो तुझा चेहरा
प्रफुल्ल ऐशी तूही सदैव
कधी भेटशील अशी जरा

पुन्हा मनीच्या माझ्या अंगणी
प्रीतमोगरा फुलला ग
तुलाच देण्या बहारपुष्पे
तुजवर आजही भुलला ग

दि. २९/०५/२१
सकाळी ०७.४६ वा.



## ५
## परिमळ सुवर्ण चाफी

हातात सोनचाफा
हृदयात आठवणी
नसते कधी तयार
मन तुझ्या पाठवणी

तो मंद गंध अजुनी
दरवळतो अंतरात
ती सोनप्रीत कवळी
आलेली ना भरात

केसात माळला मी
चाफा मनातला जो
तू धुंद होत गेली
तो भाव आतला जो

तो स्पर्श पहिलावहिला
शहारून अंग गेले
विरघळलो तेव्हा दोघे
चाफ्यास त्या कळाले

हसला नि जवळ केले
त्याने तुला मलाही
स्मरते ती भेट सुरभित
पाहताच चाफ्यालाही

मी आत आत घेतो
परिमळ सुवर्ण चाफी
आठवता भेट आपुली
येते तू बाहुपाशी

अधरांसी चुंबीण्याला
होतो अधीर मीही
लाजून चाफा चुर
क्षण मोहणारे काही

दि. ३०/०५/२१
सकाळी १०.३६ वा.



## ६
## चेहरा की भाग्य माझे

बोलक्या दो नयनांच्या गे
तेवणाऱ्या निरांजनी
त्या प्रकाशी तेजाळतो मी
जरी सावळा ग साजनी

भाव दडती लाखाचे ते
पापण्यांच्या कोंदणी
मिटतो मीही नयन मिटता
प्रियतमे तव लोचनी

कृष्ण भुवयांच्या कमानी
राखणीला सारख्या
त्या तुझ्या लोभस अदांना
नसती कधीही पारख्या

चंद्रालाही केले बंदी
माथी तू त्या सजविले
नथनी म्हणुनी त्यास तू तर
नासिकेवर टांगले

ओष्ठरागाने खुलाव्या
पाकळ्या अधरांतुनी
रंग घेती तेच तुझिया
अमृताच्या रांजणी

चेहरा की भाग्य माझे
दर्पणी मी पाहतो
त्या तुझ्या मुखकांतीवरती
विरघळुनी मी वाहतो

बांध आता बांध की मज
सोड तू प्रिये मुक्तसा
जीवनाचे ध्येय सुंदर
पूर्ण झालो मी असा

दि. ११/०६/२१
रात्री ११.०३ वा.



**७**

## पावसाळी ही पहाट

चिंब पावसाची वाट
धुंद प्रभातीचा थाट
सांज भास झाकोळले
थेंब सारे विसावले

कोसळून थकले का
नाही खेळले खेळले
थेंब वाट्टेल तसे ते
मुक्तपणे बागडले

वाट जशी ओली झाली
स्वप्ने जागेपणी आली
गंध अत्तरे लेऊन
दरवळा जाग आली

बीज पहुडले होते
प्रीत पांघरून मनी
अलगद अंकुरले
सरी येताच अंगणी

थोडी शिरशिरी येई
अंग चोरते ना भुई
परी गीत मनातले
तिचे रोमरोम गाई

पावसाळी ही पहाट
झोप साखरेची येई
सखी उठविण्या येता
निज गुलाबीच होई

दि. २२/०६/२१
सकाळी ०८.३३ वा.



## ८
## अन् हा ऋतू मोहरला

आलीस अशी किती सहजी तू
सुख उधळीत नजरेमधुनी
मी तसाच आहे तिथे थांबलो
बुडलो नयनी अजुनी

किती पुस्तके खुली करावी
तशी तू वदली काही
किती वाचले मीही ग्रंथ
तुजविण स्मरतच नाही

अशी हासली गेली उधळून
फुले लक्ष उमलुनी
माहीत नाही अशी अवेळी
कशी फुलली कमलिनी

तुझे पापण्या अलगद उघडून
तशाच मिटवून घेणे
किती भाव ते शब्देविणही
नजरेतून बोलणे

साक्षी होऊन माझ्या मनी हा
मधूमास बहरला
प्रीत फुलोरा पाहून लाडिक
अन् हा ऋतू मोहरला

दि. २४/०६/२१
सकाळी १०.२१ वा.



## ९
## का करीशी प्रीत इतुकी

का करीशी प्रीत इतुकी
गुपचूप मनात लपवून
लोकांस वाटते की
कोणी न ह्याचे कोठून

असतो मी एकटाच
गर्दीत हा बुडूनी
नाही कुणीच आपुले
प्रेमात ते पडुनी

तू ठेवतेस मजला
कोंदणी मनी जपून
झुरतेस किती माहीत
मजसाठी प्रिये आतून

दाखव ते भाव प्रकटुन
उत्सुक हा मीही पाहण्या
तोडून बांध सारे
अवखळ नदीस वाहण्या

उजळू दे भाग्य माझे
ये जीवनी प्रिये तू
भर ना वसंत विपिनी
दे प्रीत भेट मज तू

दि. २३/०६/२१
रात्री ११.२८ वा.



## १०
## सहवासाचा सुगंध बकुळी

तू बकुळीच्या गजऱ्यासम अशी
घट्ट बिलगुनी राहशील का
नाजूक देही परिमळ लेऊन
स्वर्ग सुखाला देशील का

आत राहू दे धागा कणखर
आपुल्या प्रिय नात्याचा
एक एक गुंफून घेऊ दे
प्रीतभाव हृदयाचा

मन सुमनाला ओव सारखे
क्षणकुसुमांच्या ओळी
उत्साहाच्या खुलू दे पाकळ्या
खुदकन हासू गाली

झाला का बघ गुंफून गजरा
पुन्हा नव्याने घ्यावा
सहवासाचा सुगंध बकुळी
ओंजळीतुनी प्यावा

अशा टवटवीत फुलपाकळ्या
परी बांधणी नाजुकशी
अशीच मिळू दे सखी बकुळीवत
हळुवार साजुकशी

दि. २३/१/२१
सकाळी ०६.३२ वा.



## ११
## बट हळवी नखरेल

बट हळवी नखरेल तुझी ती
रुळते मनी सुंदरी
हळू वारीशी झटका देऊन
मुरकून वरचेवरी

मला वाटते असा खोडकर
वारा तुज झोंबतो
तुझ्यावरील ते प्रेम सांगण्या
बटीतून लोंबतो

सळसळ सळसळ खेळ बटीचा
लाडिक गाली उडे
अवखळ अवखळ राजस मनी ती
उगाच अडकून पडे

ती खुशीत वेडी अशी लहरते
मनमोकळी विहरते
तुला न ठाऊक किती जणांचे
हृदय तुझ्यावर झुरते

नकोच वारू तिला सावरू
बट हळवी नखरेल
गाऊ दे तिला तुझ्या नि माझ्या
प्रीत गीता सुरेल

दि. ०८/०७/२१
सकाळी ०८.११ वा.



## १२
## कसा विसरू मी तुला प्रिये ग

नजर खिळली गं चेहऱ्यावरी
कसे सावरू सांग प्रिये
उघड्या नयनी तूच दिसे मज
मिटून लोचने स्वप्नं तुझे

त्या डोळ्यातून प्रीत सांडते
प्राजक्ताचा सडा पडे
अन ओठांतून अबोल तरीही
गीत मनातील उलगडते

अशी झुकविली नजर जरी तू
मी घायाळचि होत असे
असा खेचला जातो तुजकडे
भान कशाचे नच उरते

तुझ्या कुंतली अन बिंदीतून
श्वास माझे बघ अडखळती
तुझ्या भाळीच्या रेषांमधुनी
भाग्यशलाका खळखळती

ते कानातील लांब लोंबते
झुले मला बघ कसे झुलवी
तुझ्या गालाच्या रम्य खळीतून
सुंदरताही मज खुणवी

अशी हनुवटी किती गोमटी
सरळ नासिका चाफेकळी
त्या भुवयांच्या अशा कमानी
कमाल करती मुखकमली

कसा विसरू मी तुला प्रिये ग
विसरून गेलो मीच मला
नको विसरू तू अशा राजसा
जीवापाड जो जपेन तुला

दि. १३/०७/२१
दुपारी ०४.५४ वा.



## १३
## हसतेस किती ग गोड

हसतेस किती गं गोड
प्राजक्तासम ते अजोड
लाजतेस प्रिये तू तशीच
नाजूक अन ते स्वर्गीय

तव स्पर्श असे हा सुगंधी
प्राजक्ताची ही धुंदी
मी होतो ना कायमचा
प्रिये, तुझाच जन्मबंदी

शब्द तुझा हळुवार
वाहे माधुर्याची धार
मनच नाही तेव्हा
भाव माझे अजरामर

तू खरेच मम प्राजक्त
मी नाजूकतेचा भक्त
तू जन्मा गंधित करूनी
उरतेस माझीच फक्त

मी कठोर भुंगा तरीही
होतो अलगद हळुवार
ही प्राजक्ताची किमया
मी शिकार वारंवार

तू अशीच प्राजक्तासम
उत्कंठा शिगेला न्यावी
अंजलीत भरता तुजला
कणा कणास भरती यावी

दि.
दुपारी





## १४
## रूप गोजिरे

रूप गोजिरे
फुला लाजवीत
वेलीजवळी वेल

नाजूक सौंदर्याची
खनी ही
गोड हास्य फुलवेल

उघड्या डोळ्यांनी
तिज पाहता
मनामधे शिरते

नयना मिटुनी घेता
अलौकिक रूप
तिचेच दिसते

अशी मोहिनी
टाकतसे ती
स्मित हास्य करूनी

रूप मनोहर
कधी ना विसरते
सदैव तिज स्मरूनी

अशी कामिनी
प्रत्येक मनी
विराजीत असते

तिची तोड मग
कोणालाही
कधी येत नसते

तिचा चेहरा
गर्दीमधुनी
खुणावत राहतो

जिच्या तिच्यात मी
आता नेहमी
तिलाच नित पाहतो

तिच्या हास्याचा
सडा प्राजक्ती
मज हृदय अंगणी पडो

नाही भेटली
नजरभेट तरी
वारंवार घडो

दि. २९/६/१९
रात्री : ८.४४ वा.



## १५
## भेटतेस मला अशी

भेटतेस मला अशी
ऋतू लेऊन जराशी
तऱ्हा तशा वेगळ्या
स्पर्शातून पाकळ्या

कधी शरदाचे चांदणे
मला ओठात ते गोंदणे
जरा शीतल वाऱ्यातून
मला येऊन बिलगणे

हेमंताची गंमत भारी
थंडी वाटे अशी कहारी
स्वतःच येतेस जवळी माझ्या
प्रेमाची ऊब लुटण्या सारी

तेवढ्यात येतो शिशिर भकास
तुझा दुरावा, गळते आस
निष्पर्ण झाड अन मीही उदास
कटता कटेना युगुल मास

धिरास मिळतो कोंब नवा
वसंतातला प्रणय हवा
अंगोपांगी फुलून येता
शृंगाराचा बहर पहावा

असह्य उष्मा ग्रीष्माचा
क्षण मलाही तू अव्हेरण्याचा
घर्मबिंदूनी कोमेजलेला
तप्त चेहरा पाहण्याचा

अशी येते वर्षा, लेऊन हर्षा
अधीर मी तव ओल्या स्पर्शा
सरीतून बेभान बरसतेस
नभी वर्षा की कवेत माझ्या

सहा ऋतूंच्या अदा सहा
मनमुराद ओथंबून नहा
तव तनामनाचे अलंकार ऋतू
गंध वेगळे मनी मरवा

दि. ४/७/१९
सकाळी ८.२० वा.



## १६
## लाजण्याची तुझी अदा

लाजण्याची तुझी अदा
घायाळ कितीदा मीही फिदा
चोरिशी अंगा, मनात दंगा
तरी थांबतो, मी श्रीरंगा

मोहक चेहरा लाजताना
येते कुठूनशी गाली लाली
'मी रसिक तुझा', एवढेच म्हणता
प्रिया माझी गोरीमोरी झाली

पाहता पाहता मुखचंद्रावर
दिव्य अलौकिक येई झळाळी
सौंदर्याच्या मज योग्याची
अल्लख म्हणता भरते झोळी

तू लाज लाजुनी मिटशी नयना
अनिमिष नेत्रे मी, प्राशितो तुजला
दिसते मजला लाजण्यातुनी
विश्वात तुझ्या हा साजन सजला

सारे शृंगार, सारे भाव
अवचित अबोल लज्जा नाव
मी विरघळतो, माझा ना उरतो
समर्पणाचा तुझा स्वभाव

लज्जेची तू वसने ल्येता
फुलापरी मी कोमल होतो
परागकण हे वेचून घेण्या
प्रेमकोशी मी बंदी होतो

दि. ४/७/१९
सायं. ५.४५ वा.



## १७
## जेव्हा हसतेस तू

जेव्हा हसतेस तू
मोकळे रम्यसे
संपतो अंधार हा
दिसतसे कवडसे

मी काळजीत बुडता
चिंतेत असा गढता
जणू मार्ग दावणारे
स्मित हास्य देशी मला

गर्दीत मी एकटा
वारा विराण होता
डोळे मिटून घेता
तव हास्यमधुर चेहरा

दूरदेशी भटकताना
जग नूतन पाहताना
मी स्मरतो कुंदकळ्यांना
हास्यातून सांडताना

बसता जरा निवांत
नदीकाठ ही शांत शांत
तू जळात हसतेस तेथे
मन माझे गं विश्रांत

मी जगतो म्हणजे काय
तव हास्य हाच उपाय
औषध तुझे हे हसणे
अन मनात हळूच बसणे

तू गाली अशी हसावीस
भेटाया मी कासावीस
हास्याचे चुंबन घेता
मौनवस्त्र नेसावीस

दि. ४/७/१९
सकाळी ७.२७ वा.



## १८
## गुंतलो शब्दात मी तर

गुंतलो शब्दात मी तर
ती कहाणी बोलली
शब्दही ना बोलता ती
नजरेतून आऽऽ कळली

मी तिच्या मुखचंद्रावरती
भाळलो असा भाळलो
मी विसरलो मजला ऐसा
वाट चांदणी चाललो

गाली हसली लाली वसली
कुंदकळ्यांची ती मुखश्री
इह लोकीच्या नक्षत्रांची
तीच पाहून तेजश्री

अलंकार किती शोभून दिसले
तिच्यासवे ते उठून दिसले
असा चेहरा मनीच ठसला
हृदयामध्ये जाऊन बसला

मी बोलत होतो, सांगत होतो
लावण्याची कथा अनोखी
ती हसून एकदा नयने गेली
ग्रंथ कितीसे लिहून सारखी

मी गद्यामधला शब्द शोधला
ती कवितेची पंक्ती झाली
मी जोडत बसलो शंख शिंपले
ती स्वातीचा मोती झाली

मी शब्दांचा बनून दास की
सेवा त्यांची करीत दमलो
ती शब्दांची होत स्वामिनी
काव्य प्रसादे शारद इमलो

दि. ९/१०/१९
रात्री १०.३८ वा.



## १९
## पैंजणाची रूणझुण

पैंजनाची रुणझुण
हृदयात उतरते
सखी चालताना तू
त्याची रांगोळी चितारते

घरभर घुंगरांचा
श्रवणीय नाद घुमे
राग असे आळवीशी
अनुरागी गात गाणे

तुझ्या पैंजनाची नक्षी
तसे रम्य क्षण असती
मीना भरल्या जागेत
एकांत जाऊन बसती

घुंगरांचा नाद थांबे
काळजीची रेघ उमटे
काय झाले आज प्रियेच्या
पैंजनाची तार तुटे

हृदयाची तार बनली
मधुर स्वरा सावरण्या
झडकरी आणीन नूपुरा
शोभा पदांची वाढवण्या

केवळ नसती पैंजणे
संकेतांचे ते गोंदणे
मुखरित घुंगरांचे बघ
दिवसा पडते चांदणे

बिलगून जाता पदास आता
नूपुर होईन तुला न कळता
विरहाचा मग प्रश्नच नाही
तुझ्या पदी मी चालत राहता

दि. ५/७/१९
सकाळी ७.०३ वा.



## २०
## चिंब भिजले फूल वेडे

चिंब भिजले फूल वेडे
भूल ऐशी पाडली
थेंब पडता पाकळीवर
किमया कैशी घडली

बरसणाऱ्या सरीत
ओथंबून रंग मिसळले
भावनांच्या हिंदोळ्यावर
थेंब काही थबकले

गुंगलेल्या धुंदलेल्या
पाकळीला ये शहारा
मेघ बरसे तिजला स्पर्शे
आवेगाचा हो निहारा

पाकळीतून साचलेले
पाणी खाली ओसरे पण
पाकळी ना विसरू शकली
बेभान त्याचे आपलेपण

तो शिडावा नित घडावा
पाकळी लाजून चूर
अंग चोरून घेत राही
वेगळा पाऊस पूर

फूल भिजले थोडे थिजले
थंड लेऊन गारवा
क्षण असेही गारठावे
आगळा शिरशीरवा

रंग लाली पावसाला
फूल पाणेरी जरा
मीलनाच्या सोहळ्याला
जायबंदी नजरा

प्रणयबंदी पिंजरा
अजब धुंदी ही जरा
श्वासमोगरी गजरा
थरथरत्या अधरा

पाकळीसम चेहरा
गोरामोरा लाजरा
वसंत येई बहरा
उत्सव हो साजरा

दि. १३/७/१९
रात्री १२.३३ वा.




## २१
## शरदाचं हे चांदणं

शरदाचं हे चांदणं
प्रिये असंच राहू दे
अमृताचं वरदान
मज रोजची लाभू दे

नाहशील तुही येथे
स्वच्छ विमल प्रकाश
निशा जागवत चंद्र
कसे मोकळे आकाश

रात्र जागरण करू
चंद्र सांडतो अमृत
आज औषधांना सिद्ध
करतील वैद्यराज

खेळ मांडून आनंदे
साक्षीला निशाकर
ओंजळीत चांदण्याच्या
टपोऱ्या क्षणा भर

भर रात्रीला बहर
भावनांना की उधाण
आत संयमाला किती
बघ येतंय आधान

जमतील सखे सारे
तरी दिसशी तेजाळ
सूर छेडशील असे
गोडव्यानं ते मधाळ

संवत्सरी एकदा ही
कोजागिरी येते आणि
जीवनाच्या ओसाडल्या
रानामध्ये पाणी पाणी

कोण जागृत आहे
लक्ष्मी गं विचारते
झोळी भरण्या सुखाची
धरेवर संचारते

तूच शारद लक्ष्मी
तूच चंद्राची चांदणी
चांदण्यात मज चिंब
करशील रोज राणी

तुझ्या अमृताच्या बोला
झेलण्या गं आतुर मी
शरदाचे हे चांदणे
शतवार ये जीवनी

दि. १३/१०/१९
सकाळी ७.४५ वा.
कोजागिरी पौर्णिमा

## २२
## पुण्य बळाने येती कोणी

पुण्यबळाने येती कोणी
सहजी आयुष्यात
सारी सारी नाती होती
फिकीच त्या पुढ्यात

त्या प्रेमाची सर ना कशाला
अनामिक नाती
बंधन लौकिक नाही तरीही
बंध असे होती

किती शोधिले प्रेम अजोड की
व्यवहारंच होती
जन्मोजन्मीची फळता साधना
तव प्रेमाचे मोती

कसे प्रेम हे तुझे सखी गं
श्रम सारे जाती
सांग कशाची तू बनलेली
कसली ही माती

तुझे येणे मज चैतन्याचे
गाव जणू भेटणे
प्राणपणे जी वाट पाहिली
पांग तिचे फिटणे

स्पर्श तुझा होता गं मजला
कणाकणातून जगणे
अणुरेणूंच्या नवजन्माने
जीवन हे देखणे

हे प्रेम तुझे की भक्ती मजला
कधीच कळले नाही
वळण कसे हे मधूर ऐसे
गूढ हे वळले नाही

भावभक्ती ही अथांग सुंदर
उत्कट तुझी ही प्रीती
अवीट गोड या तलम भावना
आकळण्या जन्म हे जाती

दि. १२/१०/१९
सकाळी ११.३२ वा.




## २३
## फुलांचे भरले संमेलन

फुलांचे भरले संमेलन
एका झाडावर कोमलपण
सौंदर्याचा महापूऽऽऽर
प्रियजन माझे अतिदूऽऽऽर

आठवावे तिचे ते गाल
लज्जेने गुलाबी लाल
फुलासम नाजूक स्पर्श तिचा
मी होतो क्षणात बेहाल

डोळ्यात लाऽऽज दाटे
आज ती वेगळीच भेटे
गुलाबी गुलाब अत्तर
फेकते कटाक्ष सत्तर

कपोली घर्मबिंदू जमती
दवाचे थेंब पाकळीवरती
पुसाया थोडा नजीक जाता
बिंदुही थरथरून उठती

अधर की सडे अमृताचे
भरले तिथं घडे मधुरतेचे
टिपून घेताना स्मितहास्या
बरसणे मृदुकोमलतेचे

चेहरा तिचा की फुललेला
गुलाबी गुलाब रुळलेला
कधी ना सुकतो तो तवाना
जगण्यास गंध आऽऽला

स्पर्श ते तिचे मुलायम की
फुलांचे शरीरी गुंफण
तिच्या प्रेमात ते बेधुंद
फुलांचे तनी परिमळ मंद

आठवांनी मी कासावीस
जड जड सरती ना हे दिस
ती नाजूक शिकारी होऊन
सावज करते मज काळीज

फुलांनो, गुलाबी होताना
तुम्हीही तिलाच पाहता ना
मधाचे सुगंध भरताना
तुम्हीही तिलाच स्मरता ना

शिका त्या साऱ्या अदा तुम्ही
माझ्या प्रियतमेच्या की
लाडकी तुमची ती होईल
तलम मऊ जगणे जी शिकवील

दि. ०७/११/१९
सकाळी ७.५४ वा.



## २४
## मोगरा जाई जुई वा

मोगरा, जाईजुई वा
सायली की ती अबोली
प्रेम ते गुंफताच सूत्री
गजरा गंधित होतो गात्री

विणता दोऱ्यात प्रेम तुझे
नाजूक फुलेही होती तुझी
तुझ्याच केशी सजण्यासाठी
आस नेसून उभी केव्हाची

सखी हा गजरा
हृदय माझे
माळतो गंधाने
भरून गेले

हातात गुंफली फुले सांगती
गजऱ्यात तू दिसे गोजिरी
लज्जा तुझ्या डोळ्यातून सांडते
फुलांशी तू गोड चाळा मांडते

तू हसशी मंद, पसरे लाली
गजरा हसतो खुदकन गाली
मी चुंबून घ्यावे ऐशा क्षणांना
माळल्या गजऱ्या की प्रेमनजरा

खुलते तुझे रुपलावण्य
परिमळ भर जीवनगंध
गजऱ्यात सखी अजून धुंद
मलाही तिचा तो गजरी छंद

आठव प्रिये, क्षण दोघांचे
प्रेम गजरा जाणे दोघांचे
सहजीवन त्याने भारले
गजरी प्रियेला सदा स्मरले

गजरा माझा जीव आहे गं
तुझ्यात गुंतला तोही जसा गं
तुला सुखाचे मोगरी क्षण
देऊन सुकणे सार्थक जाण

किती प्रसंग, छटा प्रेमाच्या
गजऱ्यात मी ओवल्या ज्या ज्या
तुही अजून टवटवीत
प्रिये घायाळ मनपाकळ्या

प्रथम पाहता विरघळलो
आजही तसाच तळमळलो
तू लाजून माझा जीव घेतला
घालमेल सांगू कशी गं तुला

नजर माझ्याऽऽवर रोखशी
गजरा दिलाऽऽऽवर फेकशी
हाय मी वेडा पुन्हा पुन्हा अन्
तू काही न झाल्याच्या जणु आवेशी

मी तुझाच प्रिये तुझाच राहीन
गजरा होऊन तुलाच पाहीन
तुझ्या गंधाने भारून जाऊन
पुन्हा पुन्हा मी नवा होईन

दि. १/१२/१९
सकाळी १० ५८ वा.




## २५
## तू चंद्राची गं कोर

तू चंद्राची गं कोर
माझी चित्त चकोर
माधुर्य वाटणारी तू
शीतल मुग्धा मृदुशार

वाकून पाहतेस जेव्हा
मनात माझ्या बसतेस
अदा तुझी वेगळी
मज तुझाच करून राहतेस

तुझ्या सात्विक सौंदर्याचे
चांदणे जाते पसरून
मग चांदणराती मजला
आकाशातून विहरून

ते हास्य तुझे दबलेले
मर्यादेने थांबलेले
डोळ्यात प्रतीक्षाक्षण गं
ना कधीच सांगितलेले

तू अबोल तरीही बोलकी
मज शब्दवाचून सांगती
नजर इशारे सारे सारे
प्रेम खरे ते मागती

तुझी छबी कोरूनी ठेवली
मनपटलावर कायमची
तू ये माझ्या जीवनी
मज मिळेल शक्ती जगण्याची

दि. २१/७/१९
दुपारी १.०१ वा.



**२६**

## छत्रीत सांडलेला

छत्रीत सांडलेला
पाऊस चिंब ओला
मनी आस भिजण्याची
परी छत्र नखऱ्याला

नक्षीदार रंगीबेरंगी
झालर टोका आली
छत्री आज बघ ना
कलाकार प्रिय झाली

पावसाळी छत्री आली
घेऊन मजाही ओली
ती मजसवे भिजते
अन छत्री पुन्हा लाजते

छत्री सारे जाणते
प्रेम आमुच्यातले
तीही बंद डोळ्यांनी
देखते अनुभावते

छत्री तिला मी दिली
प्रेम खुण म्हणोनी
तीही वेडी जपते
ओली स्वतः होऊनी

दि. २१/७/१९
सकाळी ९.३९ वा.




## २७
## अशी पाहू नको

अशी पाहू नको
मी विरघळतो
काय होते न माहीत
मी पाघळतो

डोळ्यात अशी मज
कोंडू नको
नजरेतून सारखी
भांडू नको

तू पाहतेस पण
शर मदनाचे
सरसरसर कोसळती
मी व्याकुळतो

नुसतीच दुरून तू
हसतेस अन
सागराकाठी
हा पांथ तरसतो

तू सहजीच सारे
करीशी पण
मी कणाकणाने
अधीरतो

अधरांचे तू
करीशी नखरे
अन अधांतरी मी
झुरझुरझुरतो

नुसतीच दुरून
रतीची प्रतिमा
पाहून मदन मी
पेटपेटतो

त्यातच येती
पाऊस सरी न
तू भिजूनी मजला
चेत चेत चेतवते

अशा कुरघोड्या
मदनखोड्या
करू नको मी
वाहून जातो

त्यातच लाजून
मजला पाहून
डोळे असे तू
मिटताना

क्षणात मीही
प्राशन करतो
भाव गहिरे
तुज पाहताना

स्पर्श वेड्याला
सजा नको ना
केवळ दुरून
पाहण्याची

दे आज्ञा मज
जवळीकतेची
कवेत तुजला
भरण्याची

तुझ्या डोळ्यातील
भावरंगी मी
रोज रोज बघ
एकरूपतो

तळमळतो ना
प्रिये तुला मज
जवळी घेण्या
आसुसतो

सौंदर्याचे अत्याचार
पुरे गं राणी मी बेजार
सामावून घे मजला तू
थांब म्हणू नको वारंवार

दि. २१/७/१९
सकाळी ८.४७ वा.



२८

## फुलं भरल्या करंड्या

फुलं भरल्या करंड्या, सजल्या दारी
लेवून गंधाची अत्तरे
दरवळ जाता चोहीकडे, मी लपवू कसे
जर गंधच देतो उत्तरे

घरात ठरला शुभ सोहळा
लगबग झाली सगळीकडे
करंडीत आनंदही भरला
हसून फुलांनी फेर ही धरला

नवरीसाठी गजरे झाले
चेहरे सगळे हसरे झाले
सुवासिनीही धावत आल्या
वरमाला वधूमाला सजल्या

मंगलाष्टके मंत्रोच्चार
विवाहविधीचे सोपस्कार
मनात फुलता गजरा आता
नको अन्य काही उपचार

देवधर्म पूजा संस्कार
देव गळ्यातील मोगरहार
मृदु फुलांचा साज शृंगार
गंधमोगरी धूपाचार

आज दिवस संपेल असा
नवजीवन आशा ही निशा
मंचक सारा मोगरामय
ती माझी नि मीही तिचा

संसाराची बहरेल वेल
मनात बंदी मोगरवेळ
गंध तिचा की, गंध फुलांचा
सारा माझा अंतरखेळ

भरभरून मी जगता क्षण
गंधित वेळा गंधित मन
एक मोगरा किती सांगतो
वेचून घेतो मी पटकन

एक कुपी हृदयात माझ्या
अंतरी बसली, गंध मोगरा
निवांत बसता दरवळ देते
पट दाखवते सगळा सगळा

दि. १८/०७/१९
दु. ०१:३०



## २९
## तू कामिनी मनमोहिनी

तू कामिनी मनमोहिनी
दिसतेस मला गं सदा
घायाळ मला करती ऐशा
तुझ्या निराळ्या अदा

तू साडी नेसते की
लावण्य लपेटते
कलेचं ना गं मला
साडी शोभते तुला

केस मोकळे रूळती तव
खांद्यावर सळसळती
गंध केवडा फुलांचा सडा
माझ्या अंगणी

कर्णफुले लांबलांब डुलती
गालाला स्पर्शून सांगती
ऐक सखे सजनाचे म्हणणे
गात राहतो तो तुझेच गाणे

गळ्यात घालीशी मौक्तिकमाळ
मण्यामण्यांची ती अळमाळ
हृदयस्थळीवर रूळताना
स्पंदने तुझी कळतील ना

पायी पैंजणे लपतील गं
छुमछुम छुमाक वाजतील गं
पाऊल पडता पुढेच थोडे
नजरेत येतील सुरेख तोडे

स्त्री सौंदर्याची देवता
तू रतीराणीची मूर्तता
मी साधक तुझा तू ऐक आर्तता
तुझी प्राप्ती जीवन पूर्तता

दि. २३/७/१९
रा. २३/७/१९ वा.



## ३०
## तुझ्या डोळ्यात जग माझे

तुझ्या डोळ्यात जग माझे
हसता लाडिक खळी उमटते
भाळी टिकली भृकुटी कमान
चेहऱ्यात वाचू दे, मन गं किमान

अशी हसतेस, भुलतो मी
दंत कळ्यातून उमलतो मी
तुझ्या अधरात गीत माझे
पावसाने चिंब केले

ऊब देता मी तुजला
जेव्हा कवेत ओढले
थेंब ओघळून आले
केसातुनी नव्याने

गजराऽऽ अधिकच भिजला
वारा श्वासातून थिजला
त्या वेळा, ते क्षण गं
लाघवती पुन्हा पुन्हा मजला

मी खोल खोल डोहात
तुझिया सखोल बघण्यात
कटाक्ष टाकिशी ऐसा
मी तुझ्याच जादूगरीत

ते हसणे गोजिरवाणे
ते दिसणे, लाडिक पहाणे
मी विसरू कसे गं राणी
ते तुझेच मूक तराणे

नासिकेत चांदणीरत्न
नेत्रात काजळी कोर
पापण्या उघडती मिटती
मी अनिमिष होत शिकार

तू बोलत काही नाही
डोळ्यात सागरी उधाण
मी तृषार्त पांथ किनारी
घे तुझ्यात सामावून

दि. २८/७/१९
दुपारी २.३१ वा.



## ३१
## उंच उंच वनराजी हिरवी

उंच उंच वनराजी हिरवी
तिने हिरवे पाचू पांघरणे
आनंदाने डोलत असता
कडे कपारी गोंजरणे

नयनरम्य दिसतसे परिसर
स्वच्छ तयातून रस्ता सुंदर
निर्जन स्थानी, मनही शांत
सोबत तू मज असता निवांत

चल चालूया घेऊन हाती
हात परस्पर मित्रत्वाचे
जगणे दुसरे काय असावे
संगत नाते अतूटतेचे

आतुरता झाडांना कळते
तेही मनाला समजून घेती
खांद्यावरती टेकव डोके
ते पंखा वाऱ्याचा धरती

ते साक्षी असतात खरे गं
वाणी आपुली नसे तयांना
ऋतुराजाला घेऊन संगी
ते रमवती बघ आपुल्या प्रियेला

वरून धुक्याला पांघरून वधू
वनराजाची सजली धजली
तू मी लहान, तरी भाव जाणते
मनात माझी तू सांगिनी रुजली

असेच राहो प्रेम आपुले
मैत्री त्याचा धागा असू दे
आज इथे चालतो पाऊले
भविष्यात हे चित्र दिसू दे

दि. २९/७/१९
सायं. ६.२३ वा.




## ३२
## गुलाबी छटेची

गुलाबी छटेची
फुले देखणी ही
मनाला उगाचच
कुणी आठवे की

जडावा जीवाला
असा छंद वेडा
गुलाबी नशेचा
मनी खोल वेढा

कुठे स्पर्श थोडा
गुलाबी फुलांना
कुठे तो खुलावा
हळूच लाजताना

ते दिस होती तेव्हा
गुलाबी शराबी
नजर ती अजुनी
वेड लावी जरासी

कुणी पाकळ्या
ओठी त्या ठेविल्या की
जीवास बेचैनी
सदा अंतरी ती

बहर हा गुलाबी
मदनगोजिरा की
रती सांडते
रंग श्रृंगारगंधी

विसरू कसा तो
तुझा रंग राणी
कवळून घेता
गुलाबी कहाणी

दि. १/९/१९
सकाळी ७.३७



## ३३
## एक फूल वेलीवर

एक फूल वेलीवर हसले
दुसरे शेजारी
स्पर्शून त्याला घेण्या आली
रमणी गोजिरी

साडीचोळी थाट दक्षिणी
सुंदर काया ती
वस्त्र तलम की कांती तिची
ती भासे मोहिनी

सुवर्णकंकण रुळे मनगटी
करी शोभा आली
अंगुलीत अंगठी नाजूकशी ती
विराजित झाली

कर्णभूषणे कानी शोभती
मोहित ती झाली
तिच्या श्रुतींच्या सौंदर्याने
ओशाळून गेली

केसांमधला गजरा बोले
रहस्य आनंदाचे
तो चिकटून तिज सदा कुंतली
टिपतो क्षण मोदाचे

थोडी हसरी, नजर फुलावरी
वेल तिने झुकविली
प्रेमळ स्पर्शी दो करांनी
तिने तिजला गोंजारिली

वेल भाळली तिजवर ऐशी
तिलाच पाहून घेते
तिचा चेहरा फुला लाजवीत
प्रसन्नवेल तनू ल्येते

दोन सुंदऱ्या एकमेकींना
बोलू पाहती
फुलराण्या की राणी फुलांची
निरखून त्या घेती

दि. २९/७/१९
सायं. ७.३६ वा.



## ३४
## डोळे तुझे माझे

डोळे तुझे माझे
पाहतात काही
स्वप्नाला आपुल्या
जर जरतारी

चाहूल पावसाची
घरट्याला येई
भिजू थोडे थोडे
हिरवी रानजाई

रंग तुझा ओला
गंध मातीतला
घरट्यात जीव
दोघांचा रुजवला

कोंब कोवळा की
चिवचिव त्याची
चोचीत दाणा देऊ
मधात भिजलेला

साथ तुझी माझी
फांदीवर रुळे
डोळ्यातून स्वप्न
तुझ्या प्रेमानंच फुले

दि. १/९/१९
सकाळी ९.४१ वा.




## ३५
## पायी प्राजक्ताचा सडा

पायी प्राजक्ताचा सडा
कोमल सुखांनी स्पर्शीने
सुख वेचावे वेचावे
हात गंधाळून जाणे

तुझे प्रेम माझ्यासाठी
फूल पारिजातकाचे
लोक तुडवतील गं
मला जपणे जपणे

तू हळुवार कित्ती
भाव तुझे अलगद
मन तुझे कोमलता
लाजशी मी भाळता

एक आशेचा किरण
तुझ्या अळुमाळू फुला
केशराचा रंग त्याचा
वाटे जीवालागी भला

तुझे फुलणे फुलणे
आसमंती सुरभी गं
माझ्या देहाला मनाला
गंध वेडाचे लावणे

तुझे ओघळणे फार
अलवार अलवार
वेणू वाजवीशी नित
अंतर्यामी भुईवर

तुझा गंध बेभानसा
स्वर्गीय सुखकोश
मी कृष्ण सखा तुझा
तूचि रुख्मिणीची आस

दि. १५/९/१९
सकाळी ८.११ वा.



## ३६
## पदराआडच्या मुखचंद्राचा

पदरा आडच्या मुखचंद्राचा
अंदाज जरा मी बांधत असता
मित्र प्रियवर वारा मदती
सू ऽऽ सू ऽऽऽ धावत येता

काम तयाने केले सोपे
चेहऱ्याचा पडदाच उडवुनी
ती बावरली, अन् पुटपुटली
वारा गेला पदर पाडुनी

शीऽऽऽ बाई मेला
जोरात वाहिला
चेहरा उघडून
झाकून जो ठेवला

क्षणात वारा गडबडला
वाहात थोडा हडबडला
सुंदरीस या नजर ना लागो
काय करावे बडबडला

पाप न होवो माझ्या हातून
शाप ना लागो रमणीचा
मित्र टपुनी बसला आहे
वेडा तिच्या लावण्याचा

न पाहता तिज इतुका बावळा
पाहून कैसे होईल त्याला
मला काळजी मित्र सख्याची
मदन बाधा ना होवो त्याला

हळू वाहुनी उडवीन थोड्या
तिच्या मोकळ्या कृष्णकुंतला
त्या केसांच्या झिरझीर पडद्या
आडून त्याचा जीव गुंतला

काहीच ना नजरेस पडतसे
आता थोडा अंदाज बांधण्या
मित्र तिला पाहून सुखावेल
भविष्यचित्र तो लागो गोंदण्या

कुंतल आवेष्टित मुखाला
पाहून मजला हर्ष जाहला
काहीच नसे त्यापरी थोडके
मानून घेईन मी गोडाला

हे रमणी गं रसिक तुझा हा
तुझ्या हास्यसागरी बुडाला
वाचव अथवा बुडू दे त्याला
नकार नाही तव मर्जीला

एक झलक ही अशी मिळाली
तहान थोडी वाटे शमली
अजून तुला बघ निरखून घेण्या
भूक पुन्हा तरसून गेली

दि. २१/९/१९
सकाळी ११.३१ वा.



## ३७
## अलगदशी लेखणी

ओठांमध्ये नको धरू गं
अलगद अशी लेखणी
शब्द कसे ते फुटतील
ते तर भांबावून जाती

दंतकळ्यांनी दाबून थोडा
रस त्यांना देशी
अधरांच्या कोंदणी लेखणी
शब्दराशी मदहोशी

नाजूक बोटे धरून ठविती
लेखणीस हळुवार
कैद अशी ही हवीहवीशी
तीर मनाच्या पार

मुखगंधाने दरवळली बघ
गंधगुणी लेखणी
ती तुझ्याने, तू तिच्याने
कोण किती देखणी

पुरे पुरे गं क्षणात मीही
आलो अधरांशी
देह राहिला दूर परी
मन झाले लेखणी

जन्मभरीचा बंदी होऊन
जगण्या मी तैयार
अशा देखण्या कोठडीतल्या
क्षणात विरघळणार

दि. २१/९/१९
सकाळी ९.४७ वा.




## ३८
## छेडीशी नवे तराणे

ते निळेशार नभ
वसुधा हरिता हरिता
काय घडले असते
सभोवतीने पाहता पाहता

ऐकू येई मज नाद सुरेल
फिरता फिरता
अव्यक्त अशा त्या कथा
आपुल्या स्मरता स्मरता

असेच भारावले दिवस ते
आठवते मज रीत
मी गीत गातसे मदिरा ओठी
मदिराक्षी तव प्रीत

दिवस आजही तसेच राणी
काय तुला जाहले
कदाचित तू गाऊन गाणे
अन्य कुणा रिझविणे

तरीही वाटे सोबत आपण
चालून जातो वाटा
रस्त्यामधल्या झाडांसवे तू
चालत जवळी माझ्या

ते प्रेम आपुले फळले होते
पुन्हा पुन्हा मी स्मरतो
या तशाच अगदी फुलल्या
दिवसांमध्ये पुन्हा मी रमतो

तू नाहीस परि मजसवे सखी ग
छेडीशी नवे तराणे
मी आठवातुनी फिरतो वेडा
ऐकू येई ते गाणे

दि. ०६/०८/२१
सकाळी ०८.१९ वा.



## ३९
## जर तू आली असती जीवनी

जर तू आली असती जीवनी
बहरे प्राजक्तांगणी
अन बकुळी फुलली असती
एकदाच दोघा मनी

रोजची मग चांदणे
आलेच असते ओंजळी
मंजुभाषी शब्द मधुरा
दल खुले मन पाकळी

रूप गुण प्रज्ञा प्रतिभा
अन्नपूर्णा रांधली
तूच लक्ष्मी शारदाही
असती मज गृही नांदली

मी असा भुललोच असतो
क्षणक्षणी तू साजिरी
मी तुला निरखून पाहत
राहिलो तशी गोजिरी

ते नवेपण कधी न संपे
तू नवी नित मानिनी
मजला हवी होती तशी तू
आजही गं कामिनी

भोवताली मी तुझ्या
असतो सततचि राहिलो
नकळता तुज सारखा
मी न्याहाळून ग पाहिलो

तू अशी मनमोहिनी
रती सुंदरी अनुगामिनी
अर्थ मजला लाभला
असता तू जर मज स्वामिनी

दि. १२/०८/२१
रात्री ०९.५७ वा.



## ४०
## पालवी नव उमलुनी

का मनी हुरहूर वेडी
जिवलगा भेटीस ही
तो तिथे तुज गुंफताहे
का अशी बघ ओढ ही

उमलुनी ऋतू फुलले सारे
हिरवाई पसरे वनी
नवीन जगणे रंगताना
नवलाई दोघा मनी

का अशी धडधड उरी
मज चैन नाही अंतरी
घे मला समजून सजना
लाज उमटे अंबरी

त्या तिथे बघ रंग पसरे
इंद्रधनुसम अंगणी
अधरी थरथर वाढलेली
दव दवाच्या कोंदणी

ही अशी का भेट होईल
पालवी नव उमलुनी
रोमरोमी भावना मज
तुज मनातून उमलुनी

क्षण असे क्षणभर कसे
ते दंगलेले साजनी
तू सदा मजजवळी राहशी
मन तुला बघ दिधले मी

ती तुझी हुरहूर नि सूर ते
मोद भरले अंतरी
टिपून घेईन प्रेम सारे
नवनवी तू सुंदरी

दि. २७/०८/२१
सकाळी ०९.२० वा.



## ४१
## पाऊसवेडी तूही

चल ना सोबती झेलू पाऊस
खुल्या आकाशातूनी
ओले झाले घरही माझे
ओल्या गल्लीमधुनी

मृदगंधाचा दरवळ सुटता
आसमंत वेडावे
आज मनाला मन सखे तू
अलगद बघ जोडावे

ओघळणाऱ्या जलधारांच्या
मनात काय हे चाले
कुठून निघाल्या बरसून गेल्या
थेंब थेंब काही बोले

तू का अबोल संगती ऐशी
स्पर्शातून तू बोल
डोळ्यांमधले भाव प्रीतीचे
मजवरती तू खोल

खोलू नको अशी लज्जा छत्री
सोडून भिजशील थोडी
मज प्रीतीच्या वर्षावातून
अमृत बरसे गोडी

कुणी न येथे या रस्त्यावर
पाऊस तू अन मीही
आज सांगतो गूज मनातील
जाणून घे ना तुही

असे आपुले गावाकडचे
पावसातुनी जाणे
अलगद सहजी आयुष्यातच
तू माझ्या ग येणे

रोज रोजचा पाऊस झेलीन
भिजून मी मनसोक्त
तुझ्या प्रीतीच्या सुखधारांनी
होईन मीही तृप्त

अवचित धरला कर तू माझा
थरथरलो ग मीही
शहारलेला अजूनही मी
पाऊसवेडी तूही

दि. ०२/०९/२१
सकाळी ०८.५१ वा.



## ४२
## झुळूक बनुनी वाहतो

का अशी बघतेस स्वप्ने
बोलक्या डोळ्यांतुनी
खोलवर रुजूनी सखे ग
उमलते तू आतुनी

काजळाच्या दोन रेघा
दाटसर तू रेखिल्या
भुवया वरती ऐटीने बघ
अर्धगोली वाकल्या

पापण्या दारावरी तू
राखणीला ठेविल्या
पाखरे बुबुळे ग भिरभिर
मज प्रतिमा गोवल्या

दो बटा रुळती त्या लटकून
जीव टांगणी लागतो
तरीही नेहमी संयमाने
मी तुझ्याशी वागतो

कंच हिरव्या काचेच्या
खळखळती साध्या बांगड्या
ठेव जपुनी राणी जाणती
मज मना त्या रांगड्या

डूल कानातील थकले
हलुनी वाऱ्यावर सदा
तेही जाणती मी किती ग
तुज अदांवर हा फिदा

भाळी सजलेली ही टिकली
रोखुनी मज पाहते
वाट बघणे जीवघेणे
ती तुझ्यासवे साहते

पिवळी कवळी लाजवंती
लाजली शेवंती ही
धीट धिटुल्या त्या बटांवर
बांधली शेवंती ती

जवळी येतो तरीही तुजला
चोरूनी मी पाहतो
टेकलेल्या चेहऱ्यावर
झुळूक बनुनी वाहतो

दि. ०४/०९/२१
१०.११ वा.



## ४३
## प्रेमचांदण शर्वरी

चंद्र शारद हासला
ते शुभ्र चांदणे सांडले
भ्रमण सारे विसरूनीया
खेळ शारद मांडले

ये शहारे चांदण्यांना
अंग त्या झटकून जरा
फुलती रोमांच जे तनुवर
ये धरेवर गारवा

मंद येती गंध कुठूनी
आसमंत वेडावला
वेडी होते मनकळी अन्
चंद्र किती गोडावला

अमृताचे चांदणे तो
शिंपितो आनंदुनी
रस भरे फलपुष्प बहरे
अन् वनस्पती पोसूनी

त्या दुधातुन मिसळूनी मग
प्रीत चांदणी चंदेरी
प्राशिता मधु घोट सारखे
पौर्णिमा ही गोजिरी

तू मला अन् मी तुला
नित पारखावे सारखे
निरखूनी मुखचंद्र सखीचा
कधी न व्हावे पारखे

लाभू दे शरदात मजला
प्रेमचांदण शर्वरी
मीही न्हाऊन चांदण्यातून
प्रियतमा तव उर्वरी

दि. १९/१०/२१
दुपारी ०१.३१ वा.



## ४४
## ऋतू मनात शरद हा

शरदाचा स्पर्श तुझा
शब्द चांदण्यांचे
भाव तुझे अलगदसे
टपोऱ्या दवांचे

हिरवाई चोहीकडे
पसरून गेली जशी
तू येता मज जीवनी
आली ही बहार कशी

रात्रींची बेचैनी
अस्वस्थसे मन सदा
आलीस तू अंगावर
लेऊन सुंदर शरदा

चांदण्याची कांती तव
ते मधाळ बोलणे
अमृताची बरसात
मजला त्यात डुंबविणे

जागणे आता किती
सहज शरद रातीला
तू अशी रहा सखी
नित्य मज तू साथीला

पिऊन घेत चांदणे
मी चकोर तृप्त हा
आल्हादा साठवीन
ऋतू मनात शरद हा

दि. १८/१०/२१
सकाळी ०९.३७ वा.




**४५**

## तू सखा सखीचाही मज

या गुलाबा काय माहीत
दव मनावर साचलेले
हृदय माझे मज सखीस्तव
मीही ऋतूवर वेचलेले

येते मजला शिरशिरी अशी
तुजसी मी पाहतो कधी
रे गुलाबा उमलते बघ
मनपाकळी तुज आधी

तूच मज आधार देशी
तूच अनवट मार्गही
तूच करशील अधीर कितीदा
तूच सुख जणू स्वर्गही

रंग तव पाहून स्मरते
मज सखी मजला सदा
त्या किती नाजूक गंधित
रेशमी रे तिच्या अदा

त्यावरी दव सांडती बघ
लज्जेचे किती देखणे
मी हळूच मग प्रीतभरले
प्रणयचित्र ते रेखणे

पहिली भेट की भेट कोणती
तू मध्ये भरतोस रंग
शृंगाराच्या किती छटा अन्
तू स्वतःतच असशी दंग

तू दिलासा तू हवासा
तू सखा सखीचाही मज
सांडूनि जातोस गाली
अधरी विश्रांती सहज

दूत बनुनी राहशी तू
आजही दोघांत ना
शब्दही ना खर्चितो मी
तूच देशील साथ ना

दि. २१/११/२१
रात्री ०८/२१ वा.



## ४६
## सांज एवढी असू दे भारली

एक सांज दे उधार मजला
निवांत क्षितिजापाशी
तुझ्या बाहूंच्या विळख्यामध्ये
मिठी अवीट जराशी

तुझ्या श्वासांच्या भात्यावरती
गीत मला तू विणू दे
त्या अधरांची थरथर वेडी
या अधरी रुणझुणु दे

मिटले डोळे चुंबुन घेईन
तनातला शिरवाही
हळूच उचलून हनुवटीवरती
पेरून दे मरवाही

हुळहुळणाऱ्या बटा कोवळ्या
रेशीम सांडुनी देतील
मला वेगळ्या स्पर्शातून त्या
डाव मांडुनी देतील

हृदयाचे ते तव धडधडणे
मिटवून मी घेईन हृदयी
तुझ्या नि माझ्या मध्ये कसले
अंतर नाही कधीही

सांज एवढी असू दे भारली
जन्मभरी ती पुरावी
तू कुठे कुठे तू कुठे कुठे
माझ्यामध्ये उरावी

दि. ०९/११/२१
सायं. ०६.५७ वा.



## ४७
## फकिरीत फकीर राहील

होईन फकीर राणी केवळ तुझ्याचसाठी
झोळीत कोणी टाकेल जर तुजला माझ्यासाठी

भिक्षा मिळेल ऐसी तप फळले मजला वाटेल
संन्यासी होऊनी मज आश्रम गृहस्थ भेटेल

नाही कुणाचे चिंतन भक्ती अनन्या करणे
प्रेमात शक्ती इतुकी कण कण सुखाचे भरणे

डोळ्यात नाही पाणी येणार कधीच राणी
सांभाळीन जीवापाड तू माझी रातराणी

जपणे तुला हा जप ग, मिळविणे तुजला तप ग
चालेन कठीण वाट, जन्माची दे तू साथ ग

नाही मिळाली जर तू फकिरीत फकीर राहील
जगण्यात रस नाही बेफिकिरी फक्त राहील

दि. ०२/०१/२२
सकाळी १०.३१ वा.

## ४८
## तिच्या चवीच्या कथा निराळ्या

फक्कड करते पदार्थ सारे
अशी संगिनी माझी
तिच्या हातची चव न जाते
रसना सदैव राजी

अगदी साधे असते सारे
घटक नेहमीचे ते
त्यात उतरते प्रेम तिचे अन
अमृत त्या पाझरते

क्षणात करते तयारी झटपट
खुशीत असते नेहमी
जप मुखातून चाले निरंतर
अन्नपूर्णा ती राणी

स्नेह टाकते घसघशीत ती
षड्रस मिश्रण होते
क्षणात जिव्हा चवी चवीने
स्वर्गसुखाला जाते

नानाविध व्यंजने चांगली
चव रेंगाळते ना
तिच्या चवीच्या कथा निराळ्या
खमंग परिमळते ना

सुगंध पसरे गल्लीबोळातून
नमुने घरोघरी जाती
देण्याघेण्यातून घट्टशी
नाती चांगली होती

तिच्या हातचे खातच रहावे
तृष्णा जागी राहते
तरीही तृप्ती क्षणाक्षणाला
उदरी तृप्तशी होते

अशी लाभता सुगरण पत्नी
संसारी मग रस
किती प्रेम मग माझे उफाळून
येते तिच्यावरंच

दि. १९/१२/२१
रात्री ०९.२१ वा.



**४९**

## रोज फिदा तुजवरी

नको झाकू ग मुखडा सुंदर
सावर केसांना
हुळहुळणाऱ्या बटा दिलावर
काढती रेषांना

त्या रेषांचे चित्र वेगळे
प्रीत रेशमाची
रेशीमधागे विनंती कुंतले
गुंतून जाण्याची

स्पर्श करूनी मी दूर सारू का
थरथर सर्वांगी
आत झाकले नयन दोन ते
स्वप्नं सुवर्णांगी

दुरून पाहतो थिजून जातो
ऊब दिलावरती
स्पर्श चेतवती कणाकणाला
प्रणया ये भरती

गाजविशी हुकूमत मजवरी तू
तरीही आढेवेढे
घायाळ पुरा मी झालो तरीही
कळते ना तुज वेडे

पुन्हा पुन्हा मज आठवतो तो
तुझा मधुर चेहरा
समीप येता सदा लाजूनी
होतो गोरामोरा

स्वर्गसुखाचे दान मिळाले
मरतो तुझ्यावरी
रोज वेगळी भासे मज तू
रोज फिदा तुजवरी
हा बंदा, रोज फिदा तुजवरी

दि. ०८/०१/२२
सकाळी ०९.५८ वा.

## ५०
## सुंदर इतिश्री व्हावी

उघडून प्रेमग्रंथ मी पाहिले पुन्हा तर
पहिलेही नाव तुऽऽझे अन् आखरी तुझेच

प्रेमास नाव काय, कैसी ही उपमा द्यावी
सहजीच तुझी वेडे मी ऐसी आण घ्यावी

जे कोरले मी तेव्हा हृदयात अढळ आहे
तू ना मिळाली मजला तरी मी अढळ आहे

जे वसले एकदा ते प्रीतीचे गाव माझे
रेंगाळते अजूनही ते ओठी नाव तुझे

ओघळले पारिजातक मन माझे हळवे होते
ते स्पर्श मऊशार ओठास कळले होते

आधे अधूरे स्वप्न मी बाळगून आहे
मिटताच डोळे राणी तुज बाहुकोशी पाहे

होईल ग्रंथ पूर्ण येशील सांगतेला
प्रीतिस माझ्या समजून घेशील कवेत तिजला

सुंदर इतिश्री व्हावी तू माझी मज मिळावी
आतुर प्रतीक्षा वेडे तेव्हा तरी फळावी

दि. ०५/०१/२२
रात्री ११.४२ वा.




**५१**

**अंतर प्राजक्ताने हरले**

पुन्हा उमलला पारिजातक
पुन्हा तुझी सय आली
तुझ्या नि माझ्या प्रीतफुलांनी
मनात जागा केली

अंगणात ते तुझे धावणे
अलगद हाती फुले वेचणे
मी मन हरखून तुला पाहणे
प्राजक्ताने गाली हासणे

देठ केशरी शुभ्र दलांच्या
मोहक संसारी डुंबून घे
सुगंध हळवे प्रीतही नाजूक
अलगद त्यांना तू चुंबून घे

ओंजळ भरली तुझी फुलांनी
ओंजळ माझ्या हाती झरू दे
परिमळ नेमके प्राजक्ताचे
तुझ्या प्रेमाने बघ मोहरू दे

कधी ना विसरेन मी प्राजक्ता
आणि प्रिया तू मज अनुरक्ता
क्षणात सुरभित होईल अंगण
वाचून घे तू माझे स्पंदन

आज जरी तू नसशील जवळी
हृदयी उमलते प्राजक्त कळी
प्रेम जपावे अंतरातले
अंतर प्राजक्ताने हरले

दि. ०९/०१/२२
सकाळी ०८.३७ वा.




## ५२
## तूच माझी स्वामिनी

काय रेखीसी सांग प्रिये तू
संदेश तुज हाती
लेखणी गुलाब होता आणिक
प्रीत गुलाबाची

इच्छुक आहे उतावीळ म्हण
हृदया तव वाचण्या
आज ठरविले तू तुज मन हे
कागदी उतरविण्या

सुहास्य वदनी विलसत आहे
भाग्य माझे उजळो
वाट पाहतो ती कबुली तू
शब्दातून देवो

जीव खालीवर होतो वेडा
सैरभैर केवढा
नयनांमध्ये झळकत होता
प्रीतगंध केवडा

आज पत्र तू लिहून मजवरी
किती करीशी उपकार
आसुसलेल्या जीवास माझ्या
जन्माचा आधार

साथ मिळो मज सदैव सुंदर
तू कांता कामिनी
होशील का ग साथीसंगिनी
तूच माझी स्वामिनी

दि. १०/०१/२२
सकाळी ०७.४५ वा.



## ५३
## मावलो नयनात मी

मावलो नयनात मी
सामावलो कुंकुमात ही
मी राहिलो नजरेत तुझिया
वाचले मधु गीत ही

ठसठशीत दिसलो कपाळी
भाग्य लिहिलेले जे भाळी
काजळाची धार गडदसी
रात भासे मज सकाळी

रोखसी मज टोकसी तू
धार केवढी धारधार
नजरेच्या बाणांनी करीशी
खोलवरती प्रिये ग वार

हरवतो मी त्यात खोलची
बुडून जाणे सारखे
कधीही राणी होऊ ना दे
मजसी लोचन पारखे

गोड हास्यातून सांगशी
ओढ ती हृदयातली
जन्मोजन्मीचे हे पुण्य की
तू मला अशी भेटली

दि. १३/०१/२२
सकाळी ०८.३० वा.




## ५४
## अवचित हात दे हाती

अथांग सागर पदतळी आणिक
साथ तुझी लाभते
क्षितिजापलीकडे सांज रवीशी
प्रिया होत वागते

मीलन होते संध्यासमयी
लाज तिची सांडते
म्हणून सागरी लालकेशरी
वैभव ते मांडते

तू अस माझ्या साथसोबती
लाख जन्म मागता
भारावलेल्या प्रीतक्षणांची
सृष्टी कथा सांगता

शीतल जलस्पर्शाने पुलकित
रोमरोम जाहले
या लाटांवर ओसंडून मज
प्रेम प्रिये वाहिले

आयुष्याचा अथांग सागर
तुझ्यासवे मी तरणे
किती लाभतील क्षण मोत्यांचे
तुझ्यासवे मी भरणे

साथ मागते उषा निशाही
साथ सूर्यचंद्राची
अवचित फुलते स्वप्नं गुलाबी
अवचित हात दे हाती

दि. १३/०१/२०२२



## ५५
## मज प्रीत पुसटशी रहावी

दिसलीस किती दिवसांनी
नवऱ्याच्या मागे बसुनी
जे वळून पाहिले तू तर
मी गेलो पुन्हा हरवूनी

तुज मान्य नव्हते ते लग्न
मन माझ्यावरती जडले
घरच्यांना नको दुखविणे
म्हणून हे पुढचे घडले

आज पुन्हा पाहता
असे वाटले मजला
शरीर कुणाचे झाले
तरी भाव कोरडाच राहिला

मन अजूनही आसुसले
ते वाट पाहते आहे
जिवलग तुझा मी इकडे
तुझ्यामध्येच गुंतून आहे

असू दे, तू जा ग सुखाने
मज नजरही एक पुरेशी
प्रेमाच्या दृढ नात्याला
मी सांभाळीन उराशी

तू आनंदाने जगावी
तुज सारी सुखे लाभावी
खोल मनीच्या तळाशी
मज प्रीत पुसटशी रहावी

दि. २३/०१/२०२२
सकाळी १०.२० वा.



**५६**

## जन्म शोधतो मी ग

किती फिक्या बघ पडती साऱ्या
वृद्धत्वाच्या रेषा
किती हासरी विलसून जाते
ओठी हास्याची रेखा

प्रेमाला ना बंध वयाचे
वय जरी वाढले कितीही
पवित्र प्रेमा नसते काळाची
अथवा कशाची भीती ही

जन्मभरीची साथ लाभते
साथ मिळेल जर आता
शब्देविण संवाद होऊनी
सूर भावना होता

नजर बोलते आताशी आपुली
समाधानाची भाषा
चित्रकारही शोधत असतो
अशी सुखाची रेखा

जरीही सदैव वरती दृष्टीने
पाहत गेलो तरी मी
तू मला शिकविले नजर झुकवणे
हारच नसते नेहमी

तुझ्या ह्या झुकल्या नयनांमध्ये
जन्म शोधतो मी ग
मीच गवसलो मला हा आणिक
कायम तुझाच मी ग

असे सोबती जगलो सुंदर
जीवन लोभसवाणे
मरण येऊ दे असेच सोबत
संगत दोघे जाणे

दि. २४/०१/२०२२
रात्री १०.३२ वा.



**५७**

**जरी झाकले नयन बोलके**

मिटतो मी ग मिटत्या नयनी
नको पापण्या झाकू
आत वेगळे विश्व केवढे
नको कोडी मज टाकू

तुझे नेत्र हे उघडे असता
खोलवरी मी रुजतो
आणिक मिटुनी घेशी पाकळ्या
स्वप्नावरी मी सजतो

बंद लोचना आडून चाले
तुझे धुंद वावरणे
मला पाहता नुसते स्मरता
तुझे असे बावरणे

वाचू शकेन मी कधी का माहीत
उघडी अक्षरे दृष्टी
बंद करून तर अजून उघडशी
अगम्य मोहक सृष्टी

कितीदा चुंबून घेतो दुरुनी
तृप्ती न होते तरीही
मिळे दिलासा अधर विसावून
नयन पाकळ्यांवरी

असे वाटते स्वर्ग दिसावा
तुझ्याच नजरेमधुनी
जरी झाकले नयन बोलके
वसती हृदयातुनी
सखे ग
वसती हृदयातुनी

दि. ०१/०२/२०२२
सकाळी ०५.५४ वा.



## ५८
## गुलवारगुलाबी

गुलबदन गुलाबी
दल पाकळ्या मल्मली
गाली गुलाली
रेशमाळलेली

तू गंधाली
मदमस्त रती मदनाची
मोहिनी साजनाची
कामिनी

अंगणात फुलताना
गंध जाय वनी
मीलनी साजणी
गुलाबाची

स्पर्श रुमाली
मज नाव कोरले
कशिद्याने भरले
गुलवारगुलाबी

नजर शराबी
ते गाल गुलाबी
हास्य जवाबी
मोहवते

अधर पाकळ्या
गुलाबी ओसंडून गेल्या
किती बोलल्या
स्तब्धपणे

दि. ०१/०२/२०२२
रात्री ०८.४३ वा.




**५९**

**तू गुलदानी**

शपथ गुलाबी
त्या तलम गुलाबाची
होशील ना राजी
मनभावनसाथी

आठवण आली
कळी गाली हसली
मनात ठसली
गोडी गुलाबी

गुलाब वेडा
मज खुणावतो ना
चोरूनी पाहता
मनी फुलतो हा

कळी बोलली
गुज हळूच खोलली
वाऱ्यावर डुलली
कळी गुलाबी

गोडी वाढली
नाती मुरली गुलकंदाची
मज छंदाची
राणी गुलाबी

तुझी छबी
अदांची गुलाबी खुबी
रुजवानी आधी
तू गुलदानी

अत्तर हृदयी
कोश घडविले कोणी
दल जणू पापणी
गुलाबराणी

दि. ०१/०२/२०२२
रात्री ०९.३२ वा.




## ६०
## मन गुलाबाचे

गुलाब फुलला
ऋतू राणी मोहरली
गंधाने बहरली
लाजली

स्पर्श रेशमी
संदेशाची सुंदर खणी
उमलतो मनी
राजगुलाब

मुक्या भावना
वाच प्रियेचे
मन गुलाबाचे
मोहक

कधी बोचतील
काटे मत्त परी
गुलाब हृदयांतरी
उमलतील

जगणे माझे
धुंद गुलाबी निशा
सुरभिल्या दिशा
गुलाबाच्या

दि. ०१/०२/२०२२
१२.४१ वा.



६१
## **कातीलसी नजर**

कातीलसी नजर
मारिसी शर
दृष्टी धारदार
फेकूनिया

बुबुळांची पाखरं
पापण्यांची झडप
मज दिलाची तडप
वाढतसे

काजळ धार
काळी शार
हास्य रोखुनी
मारिसी यार

ओष्ठ पाकळ्या
उघडून थोड्या
करीशी खोड्या
कितीतरी

नको पाहू मज
असे रोखुनी
हास्यही खुनी
मरतो मी

क्षणाक्षणाला
चेहऱ्यामुळे
मोही पडुनी
तरतो मी

तुझ्याच डोळ्यामध्ये
बुडून मी
खोल मनातून
राहीन ग

तुझ्याच नजरेमध्ये
सामावून
जगणे मरणे
वाहीन ग

दि. ०४/०२ /२०२२
रात्री ०९.२३ वा.



## ६२
## सांजवेळी

मला भेटली तू अशी रम्य वेळी
फुले रातराणी जशी सांजवेळी

मिटाया जणू पापण्या वाकलेल्या
निशा लाजलेली जणू सांजवेळी

खळी चांदणीची तुझ्या ती कपोली
नवी रीत सांगून जा सांजवेळी

तुझ्या त्या मिठीतुन मी जो बुडालो
अजूनी मला आस गे सांजवेळी

पुन्हा भेट घ्यावी तुला प्राशताना
नवी सांज यावी नव्या सांजवेळी

जगावे तुझ्या सोबतीने असे मी
जगाया तू यावीस गे सांजवेळी

दि. ०८/०२/२०२२
सकाळी ०७.५४ वा.

**६३**

## तुझी आस आहे

मला, जीवनाला तुझी आस आहे
क्षणाला मनाला तुझा भास आहे

कुणी सांगते वेड का लागले हे
दिवाण्यास वेडे तुझा ध्यास आहे

कधीही मला आजमावून घे ना
कधीही तुझ्या सोबती दास आहे

दिलाच्या तू खोलून दारास पाहा
तुझा मूर्त मी तेथ विश्वास आहे

तुला सांगतो ऐक राणी जरासं
तुझा आसमंतात आभास आहे

करू का तुझ्या नावचा गाव माझा
तुझ्या नावचा श्वास निःश्वास आहे

दि. २५/०१/२०२२
दुपारी ०४.३९ वा.



## ६४
## मज भेट अशी

कसे सांगू तुला
तू प्रिय ग मला
तू बंदी जणू
प्रीत सांगू तुला

लिहिले मी जरी
मन कागदावरी
मोरपिशी भावना
ऐक प्रिये मज मना

तुझ्याच साठी
झुरतो राणी
जीव वरखाली
पाणी पाणी

तुझी भेट अशी
जणू आस कशी
मन वेडेपिसे
राहते तुजपाशी

कसे विसरू तुला
जगणे ना मला
तुजवीण कसले हे
रितेपण ग मला

किती अधीर असा
मी बधीर जसा
तू प्राणसखी
मी तुझा सखा

चल तोड बंधने
मज भेट अशी
क्षितिजावरती
नभधरणी जशी

दि. ०९/०२/२०२२
रात्री १०.३२ वा.

## ६५
## सडा आज गंधाळला सांडणार

तुला आज सांगू कसे मी प्रिये ग
तुला नित्य मी जीव हा लावणार

मनाला असे मोरपीशी फुलारे
तुला आज मी गीत हे सांगणार

अशी वाट माझ्या मनाची घराशी
तुझ्या थांबते पाऊले चालणार

नको बंदिवासी तू राहू उगाच
तुझे भाव या काळजा चोरणार

लपूनी छपूनी असे का जगावे
खुलेआम मी प्रीतीला मांडणार

तुझे बाहुकोशी मला स्वर्ग लाभे
तुला भाव वाहून मी चाहणार

तुझ्या अंगणी पारिजाती फुलांचा
सडा आज गंधाळला सांडणार

दि. १०/०२/२०२२
रात्री १२.०३ वा.



### ६६
### गहाण असू दे दिलास माझ्या

प्रिये किती बोलके हे डोळे
कसे सावरू मना
वरती लावण्याच्या कळा मग
काळीज धडधडते ना

असा थबकलो थिजलोही मी
काही सुचेना मला
असे वाटते निरखत रहावे
मोहिनी राणी ग तुला

चेहरा तुझा की सौंदर्य
मूर्त रूप जाहले
असे देखणे रूप साजिरे
कधीच ना पाहिले

भाळून जाणे विसरून सारे
फक्त तुला प्राशने
नजरेमधुनी सामावून तुज
हृदयातही तुला पाहणे

बांधा नाजूक चेहरा साजूक
किती गोडवा भरला
बिंदीमधुनी तुझ्या चांदवा
हळुवार डोकावला

गहाण असू दे दिलास माझ्या
तुझ्या हृदय कोंदणी
सांभाळून ग ठेव प्रिये तू
लाखमोलाची खणी

दि. २०/०२/२०२२
सकाळी ११.०१ वा.



## ६७
## हायकू – आस

मस्त चालणे
धुंद तुझी नजर
प्रीत गजर

वारा खेळतो
ओढणी तालेवार
स्पर्श खुमार

वर्ण केतकी
शेलाटी बांधा छान
विसरे भान

तुला पाहून
हरवून जातो मी
थबकतो की

हृदय दिले
अंथरून पायी गे
समजून घे

अलगद दे
त्यावरती पाऊल
प्रीत चाहूल

तळमळतो
तुजसाठी प्रेयसी
मनी वससी

नको काही ग
काहीही नको मला
प्रीतीच्या फुला

ये ना जीवनी
उडेन आनंदुनी
धन्य होऊनी

दि. ०४/०३/२०२२
दुपारी ०५.४० वा.

**६८**

## हायकू – प्रीत

भल्या पहाटे
कूजन मधुरिम
स्वररेशीम

तुझी पैंजणे
करिती रुणझुण
घुंगरातून

मी न्याहळावे
मुखचंद्र गोरटे
कामना फिटे

उघड जरा
अलगद पापण्या
स्वप्नंखुणा

घेत चुंबुनी
निशा रजनीशा
मदनदिशा

रातराणी ही
निशिगंधा भुलते
प्रेमे डुलते

फुले मोगरी
सकाळ सुरभित
कोशी बंधित

नको सोडणे
प्रेयसी अनुनया
रत्न हृदया

दि. ०३/०२/२०२२
सकाळी ०९.२९ वा.



## ६९
## **स्वर्ग ठेंगणा नक्कीच तेथे**

तुझे रुबाबी भरभर चालणे
हृदयाची वाढवी ते धडधड
वेळ तुझी गाठण्या ग तुझिया
मनात शिरण्या माझी धडपड

लक्ष तुझे असताना सुद्धा
दुर्लक्षाचे तुझे बहाणे
कोपऱ्यातुनी दो नयनांच्या
चोरून हळूच ते मला पहाणे

उगाच वेगे वेगे चालून
जीवास रमणी दमवितेस तू
काळालाही थांबवून मग
पाहिजे तसे गमवितेस तू

काळाला बनवून दास जणू
हवा तसा तू वळवून जाते
कंठ नसला तरी गीत प्रेमाचे
माझ्या गळ्यातून गाऊन येते

तुझे चालणे तुझी ओढणी
वाऱ्यावरती उडवीत जाते
तुझी पाऊले नक्षी सुरेखशी
प्रीतमंडपी रेखीत जाते

तुझ्या चालण्याच्या वेगाने
स्वप्नं उरात मी फुलवत आहे
मज प्रेमाचा मधाळ आवाज
जीवनी प्रिये बोलवत आहे

वळव पाऊले माझ्या अंगणी
काही नको मज दुसरे येथे
मनाजोगी प्रियतमा लाभता
स्वर्ग ठेंगणा नक्कीच तेथे

दि. ०५/०३/२०२२
दुपारी ०१.०१ वा.



७०

**करशील देवा मला मोगरा**

फुले मोगरी हसरी हसरी
घेऊन हातामध्ये
सुगंध पेरीत जाईन सखये
तुझिया जगण्यामध्ये

असे वाटते होत मोगरा
मीच उमलावे राणी
अलगद वाऱ्यासवे तुझ्याशी
जवळून गूजकहाणी

कळी होऊनी झाडावरती
कौतुक तुझे मी घ्यावे
जवळी येशील वाट पाहशील
भाग्य डोळा मी पहावे

जपशील मजला जीवापाड तू
वेळेवर जल देऊन
वाढत जाता उष्मा सगळा
साथ देईन मी उमलून

घेशील हाती घेत जवळी तू
गंध हुंगुनी सजनी
जन्म सार्थकी लागेल माझा
गंध तुला तो देऊनी

करशील देवा मला मोगरा
तिच्या अंगणी नक्की
मीलन असू दे क्षणिक तरीही
गंधवेडी मज सखी

दि. २१/०३/२०२२
सकाळी ०७.२७ वा.



## ७१
## स्वप्नं कांचनी हो साकार

लोलक सुंदर नाव बहावा
सुवर्णरंगी फुले वाह वा
निसर्ग रमतो स्वच्छंदाने
पिवळा सोहळा असा पहावा

कुणी प्रियेच्या प्रतीक्षेत तर
कुणी अनुनय करण्या जातो
उमलून आल्या बहाव्याकडे
गुज मनीचे घेऊन जातो

उमलून उमलून हसणारा तो
प्रियारंजनी सहाय्य करतो
तप्त झळा अन ग्रीष्मामधल्या
तापावरती उतारा ठरतो

तिच्या कुंतली माळून देता
रूप तिचे ते उजळून जाते
एक अनामिक गीत प्रीतीचे
बहाव्यासवे डोलून जाते

तिचे बहाणे तूही जाणतो
तुझा केवढा मज आधार
तुझे फुलोरे अतिकोवळे
स्वप्नं कांचनी हो साकार

दि. २४/०३/२०२२
सकाळी ०९.११ वा.



## ७२
## तू अशी ग मनरमणी

रुपात माधुरी ही
हळुवार लाजरी ही
नववधू सुंदरी ही
लक्ष्मीच खरोखरी ही

रती अवतरली जणू
शृंगार शेला पांघरूनी
शालू नि अलंकार सारे
विष्णुप्रिया वाटे फिरूनी

स्वप्नं झुले नयनातून
ओठातुन शब्दफुले
चेहऱ्यावरी बुलंद
कुंकुम टिळा हा खुले

पाऊल तव पडते ग
जीवनात आज माझ्या
चांदण्याची पखरण हो
नित्य आयुष्यात तुझ्या

रूप असे मोहवीते
कसे विसरू प्रियतमे
तुझ्यामुळे स्थिर झालो
जीवनात अनुगमे

आठवितो आजही मी
तू अशी ग मनरमणी
दे हृदयी स्थान मजसी
राहू दे तुझ्याच मनी

दि. ०७/०४/२०२२
सायं. ०७.२४ वा.



## ७३
## रूप साधे मोहविते मज

सावळ्या रुपात गोडी
तू अबोली थोडी थोडी
दोन डोळे बोलणारे
वेगळाली रोज कोडी

मन्मनी तू रुंजी घालीशी
ओष्ठी थरथर का उगा
मजसी सांगते मन हे माझे
तू न देशील मज दगा

मोकळे ते केस वेडे
शोधती तुज राजसा
सांगुनी वाऱ्यास जणू ते
म्हणती आणचि आजसा

ती प्रतीक्षा जळते नयनी
ती उदासी सांड तू
एक हसू उमटू दे सखये
स्वप्न नवे ग मांड तू

का उगा ताणून धरिल्या
भ्रूकमानी वाकल्या
भावना कळल्या मला तव
तू किती जरी झाकल्या

रूप साधे मोहविते मज
मी तुझ्यावर भाळलो
दूर कोठे जाऊ प्रियतमे
कोशी तव गंधाळलो

दि. ३०/०३/२०२२
सकाळी ०७.०३ वा.



७४

**दोन जीव विसवोत**

अस्सा प्रवास प्रवास
आसमंतात सुवास
सांज केशराळलेली
नववधूचा आभास

निशाकरासाठी तिचे
झाले षोडश शृंगार
वारा शीतल तरीही
अंगी चेतला अंगार

एक नाव मदनाची
त्याच्या टोकावर मीही
टोक दुजे गाठायाचे
जिथे वाट पाहे तीही

जल भाव विभावांचे
त्यात अगणित लाटा
आज मीलने होतील
एकरूप दोन वाटा

दोन टोकांचे अंतर
असे सहजी मिटेल
दुःख अंधाराचे मग
अलगद हो फिटेल

कळतील तुला भाव
शब्द मौनात राहोत
दशदिशा हा सोहळा
नेत्र मिटून पाहोत
दोन जीव विसवोत
दोन जीव विसवोत

दि. ३१/०३/२०२२
सकाळी ०७.५२ वा.



७५

**साथी समज ग मला खरा**

गढून गेली कशात राणी
की तू रुसली सांग जरा
नकोच चिंता करुस कसल्या
साथी समज ग मला खरा
साथी समज ग मला खरा

शृंगाराच्या पूर्णत्वाने
उजळून जावा तुझा चेहरा
एक अनामिक पसरे उदासी
डोळ्यांमध्ये खंत जरा
साथी समज ग मला खरा

ते कुंकुम तव भाळावरती
गोल ठळक जरी रेखीयले
अबोल का ग तेही झाले
भाव कोणता बर गहिरा
साथी समज ग मला खरा

सळसळणारी बटही थांबे
गालावरती स्तब्ध जरा
वाराही ना हिंमत करतो
उडवून नेण्या तिजसी खरा
साथी समज ग मला खरा

ओठांवरची लाली बोलली
दुःख कोणते आत तुला
सजूनही का अपुरा दिसतो
ग्रहण ग्रासला तुज चेहरा
साथी समज ग मला खरा

बोल सखे जे हृदयी दडले
उलगडले ना जेही मला
पसरून देईन अल्लड खुशी ग
मानू नको मज तू उपरा
साथी समज ग मला खरा
साथी समज ग मला खरा

दि. २५/००४/२०२२
सकाळी ०५.५४ वा.



अजूनही झरती झरझर धारा
देत गारवा सुखावणारा
हेमंतीही...

अजूनही येतो शिरशिर शिरवा
थंडीमधला स्पर्श कोवळा
वसंतातही...

अजूनही राती नक्षत्रांच्या
तोच चांदवा पसरून देता
वर्षाऋतूतही...

## ७६
## अजूनही मी

अजूनही ऋतू बहरून फुलतो
तुझ्या येण्याची वाट पाहात
ग्रीष्मातही...

अजूनही वारा गंध पेरतो
तुझ्याचसाठी बेभान होतसा
शिशीरातही.

अजूनही ना गळते पालवी
मनास माझ्या अवचित झुलवी
शरदऋतूतही...

अजूनही मी तसाच राणी
वाट पाहतो डोळा पाणी
क्षणोक्षणी...

दि. १७/०४/२०२२
रात्री ०८.४३ वा.



७७

## तुला पाहण्या वळती नजरा

काय म्हणू तुज प्रफुल्ल चेहरा
की फुलला मादकसा मोगरा
किती छानसा हसरा हसरा
बट उडवी हा वारा लाजरा
तुला पाहण्या वळती नजरा

ती साडी जणू रंग रतीचा
मदन भाळतो त्याच गतीचा
त्यावर लाडिक नजर बोलकी
अर्थ सांगशी प्रीतीचा खरा
तुला पाहण्या वळती नजरा

गालावरती गुलाब उमटून
ओठांवरती गेले पसरून
तुला पाहताक्षणी जगते
आस तुला भेटण्याची जरा
तुला पाहण्या वळती नजरा

उगा वाढते मनात चंचल
भावभावनांची ती खळबळ
सुचतच नाही काही मजला
स्वस्थ एकटा होतो बरा
तुला पाहण्या वळती नजरा

कधी कानीचे डूल मी व्हावे
अथवा कंठी माळ सजावे
कधी लालीचा जन्म घेऊनी
तुज अधरांवर माझा डेरा
तुला पाहण्या वळती नजरा

कधी वाटते जरी न भेटशील
तू माझी ना कधीही होशील
छायाचित्रामधून स्वप्नी
तुझ्या जोडीला होत साजरा
जोडीस न लागो अभद्र नजरा

दि. २८/०४/२०२२
रात्री ०९.५० वा.



## ७८
## ती शिल्पा, ती स्वप्नाली

प्रत्येकाच्या मनात वसते
एक रमणी कामिनी कुणी
माहीत नसते येईल का ती
अलगद अलवार जीवनी

नाजूक तन्वी मृगनयनी ती
सुंदर कमनी जी मोहिनी
अधरांवरती रंग सांडले
रातांबीचे तिच्या कुणी

केशकुंतले पसरून गेले
नभांगणी जणू मेघ राण्या
पायी पैंजण रुणझुण किणकिण
कंकण करीचे गा गाण्या

तलम रेशमी वस्त्र मृदुल की
ती मृदुला मधुरा सुकुमार
अशी असावी मनात बसली
निवांत कुणीतरी मंजुळ नार

ती लतिका ती कलिका कोवळी
मदनबाण ती रती खळी
ती आशा मन्मनीची मनीषा
ती शिल्पा, ती स्वप्नाली

दि. ०७/०५/२०२१
दुपारी ०१.१९ वा.




## ७९
## गुलाबकळी होऊन जीवनी

फिक्या गुलाबी गुलाब कळ्यांनो
उमलून येता पहाटे
इथे मनातून भाव कोवळे
उमलून येती कुणाचे

वाट पाहतो मी तुमच्या या
अलगद उमलून येण्याची
घाई मला रोजचीच असते
प्रीत तुम्हांसवे कथिण्याची

रंग साजूकसा जसा हा तुमचा
तिचा चेहरा तसाच दिसतो
तेजाळून मोहक तो मुखडा
लाजून गालामध्ये हसतो

कधी साखरेच्या झोपेतच
तिचे अधर मी चुंबून घेतो
स्पर्श जाणवती तेव्हा तुमच्या
पाकळ्यांचे मी गुंतून जातो

तिच्या कपोलांवरती तुमचे
कोमल रंग नि स्पर्श फळावे
तिच्या आठवांनी बेभान मी
तुम्हास बिलगून तिज मिळवावे

म्हणून वाटते रोज रोज तुम्ही
उमलून यावे माझ्या अंगणी
तीही येईल अवचित लाजत
गुलाबकळी होऊन जीवनी

दि. ०८/०५/२०२२
सकाळी ०७.२६ वा.



८०

## पूर्ण चंद्र तो पुनवेचा

तो दिसला मुखचंद्र अधुरा
बेचैन झालो मी
आजही त्या चेहऱ्यावरी
खिळून राहिलो मी

ते सुंदरसे नयन बोलके
नजर भेदणारी
शब्देविणही सारे काही
उलगडून सांगणारी

त्या भुवयांच्या मस्त कमानी
कधीच रमलो मी
ती गेली तरी अजून त्या क्षणी
असाच गमलो मी

ती सरळ नासिका सुंदर कलिका
त्यावर नथनी सजली
अधीर जाहल्या जिवास जणू
तडपवणारी ती बिजली

गंध सुगंधही तिजवर भाळून
वाऱ्यावर पसरला
झुळूक मारव्याची होताना
वाहणेच विसरला

ती टिकली जी गोल गोल जणू
तिच्या कपाळी बसली
मोहक चांदणी जणू नभीची
भाळावरती हसली

लोलक सुंदर कर्णफुले डुल
अंतरंग होऊन
मन माझे झुलते हो त्यावर
असे फिदा होऊन

त्या ओठांच्या नरम पाकळ्या
फुलाफुलांना लाजवती
हुकुमत आपुली मज चित्तावर
पदोपदी नित गाजवती

असे वाटते पुन्हा दिसावा
पूर्ण चंद्र तो पुनवेचा
मी होऊन शशिकांत रमावा
प्रीत चांदणी सखा तिचा

दि. ०९/०५/२०२२
सायं. ०६.२७ वा.

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक – संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर – ४०० ००५

  ई–मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा (त्याच्यावरील प्रीत कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) - प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री – डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>“सर्ग_निसर्ग” ऑडिओ<br>अल्बम – “मंजुमंजिरी” | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७४
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २९
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●